(12)

पुणे जिल्हा परिषद

## माध्यमिक शिक्षण विभाग

यशवंतराव चव्हाण भवन (जुनी इमारत), सोमवार पेठ, पुणे-११

परवानगी वर्ष-२०२०-२१
परवानगी प्रकार-

शाळा सुरु वर्ष-

जाक्र.पुजिप/माध्य/२०२१/८५५६
दिनांक:-२३/१२/२०२१

**स्वयंअर्थसहायित तत्त्वारील परवानगीप्राप्त शाळा**
**नैसर्गीकवाढ मान्यता**

प्रति,

**१.अध्यक्ष/सचिव, माऊली प्रतिष्ठाण, औरंगाबाद**

**२.मुख्याध्यापक/प्राचार्य,** मारुती बधे मेमोरीअल स्कूल, स. नं. ५४, मारुती कॉम्पलेक्स बधेनगर, पुणे ४८,

**विषय :- स्वयंअर्थसहायित तत्त्वावर नवीन शाळेस नैसर्गीकवाढ देणेबाबत.**
**(इयत्ता- १०वी)**

**संदर्भ** :- १.या कार्यालयाकडील प्रथम मान्यता पत्र **जाक्र.पुजिप/माध्य/२०२१/११३२ दिनांक:- ०५/०३/२०२१**
**२.संबंधित शाळेकडील प्रस्ताव दिनांक- ०५/०८/२०२१**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेस/ विद्यमान शाळेला नैसर्गीकवाढ **देणेबाबत** संदर्भ क्र.१ अन्वये प्रथम मान्यता परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार विहित कालावधीत वर्ग सुरु करुन त्यांना नैसर्गीकवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव आपण संदर्भ क्र.२ अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेला होता. आपले प्रस्तावानुसार शाळेने पुढीलप्रमाणे वर्ग सुरु केलेले असून सदर वर्गांना खाली नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून नैसर्गीकवाढ मान्यता देण्यात येत आहे.

| शासन निर्णय, यादीतील क्रम | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | शिक्षण मंडळ | नैसर्गीकवाढ मान्यता वर्ग | मान्यता वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शा.नि.दिनांक- १४/१०/२०१९ | माऊली प्रतिष्ठाण, औरंगाबाद | मारुती बधे मेमोरीअल स्कूल, स. नं. ५४, मारुती कॉम्पलेक्स बधेनगर, पुणे ४८ | इंग्रजी | राज्यमंडळ | इ. १० वी. | २०२१-२२ पासून | |
| यादीतील क्रम- | | UDISE- २७२५ ******* | | | | | |

**अटी व शर्ती-**

१. सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ मधील तरतूदींची व त्या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या सर्व नियमांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
२. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस, (अ)शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपद्धतीचे तसेच, (ब)महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
३. जे वर्ग सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालविता येणार नाहीत.
४. SARAL (Systematic Administrative Reforms for Achievment of Learning By Students) सरल प्रणालीवर (शाळा, विद्यार्थी, शिक्षक,इत्यादी बाबतची) माहिती भरणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणे आवश्यक राहील.
५. शाळेतील आवश्यक सर्व नोंदी व अभिलेखे अद्ययावत ठेवून ते वेळोवेळी प्रमाणित करुन घ्यावेत.
६. वर्गामध्ये विहित प्रवेश क्षमतेच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. पटपडताळणी/संचमान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.
७. शाळेत पात्राताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नियुक्ती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार करावी.
८. व्यवस्थापकीय संस्था ही, विहित केलेले नियम, मानके व प्रमाणकांनुसार शाळा चालविली जात असल्याची खात्री करुन घेईल व दर्जेदार शिक्षण देण्यास बांधील असेल.
९. शालेय शुल्क निश्चित करताना, महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क (विनियमन) अधिनियम-२०११ आणि महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम-१९८७ मधील तरतूदी तसेच शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करावे.
१०. एखाद्या शाळेने, त्यांना लागू असलेल्या कायद्यातील कोणत्याही तरतूदींचे किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा शासनाने निर्धारित केलेली प्रमाणके किंवा मानके किंवा अटी व शर्तीची पूर्तता करणे थांबविल्यास, विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा पोचविणारी कृती केल्यास किंवा दर्जाहीन शैक्षणिक कामगिरी केल्यास, शाळेची मान्यता/परवानगी काढून घेण्यात येईल.
११. जनहित याचिका क्रमांक-४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशांनुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

b. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येऊ नयेत
c. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
d. शाळेची इमारत, सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकांप्रमाणे शाळेची इमारत बांधलेली असल्याची खात्री करावी
e. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. (Structural Audit)
f. ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकषांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

23.12.24

(सुनंदा वाखारे)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

**प्रत, माहितीस्तव,**

**१.मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे-१**
**२.मा.विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे-५**